भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०३/२०१७

**१) अनोळखी इसम मोटार सायकलनी येवुन मारहान करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०३/२०१७ चे ०८.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी भिमराव लक्ष्मण शेंडे वय ४० वर्ष, रा. श्रीनगर कॉलोनी सेंदुरवाफा हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ ऐ ५८५३ ने पुतनीच्या लग्नाचे पत्रीका वाटप करण्यास जात असता फिर्यादी हा लघुशंकेसाठी थांबुन मोबाईवर बोलत असतांना साकोली कडुन १ अनोळखी काळया रंगाची पल्सर मोटार सायकल चालक काळा हेल्मेट काळा जॅकेट व दोन्ही हातात मोचे घालुन आला व फिर्यादीचे पाठीवर व उजवे हातावर बुक्कीने मारुन लाखनीकडे पडुन गेला फिर्यादी हा बिटु मेहता यांचे कडे डांबर प्लॉटवर सुपरवायझर असुन त्यांच्यात गिट्टी नेल्याचे व मजुरीचे पैसे न दिल्याचे वाद असुन त्यांनी फिर्यादीस मारण्यास पाठविले असा संशय व्यक्त केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अल्पयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०३/२०१७ चे १०.३० ते ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेली आहे तीचा नातेवाहीक, गावात शोध घेतला असता मिळुन न आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशा प्रमाणे मुलगी अल्पवयीन असल्याने पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) विहरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १७/०३/२०१७ चे २३.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादीचा जावई मृतक देवीदास शंकर पारधी हा मला झोप लागत नाही व विपरीत विचार मनात येतात माझ्या पत्नीचा, मुलाबाळांचा खुन झाला म्हणुन पागल सारखा करुन पागलपनाचे भरात विहीरीचे पाण्यात उडी घेवुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी निशांत मुरलीधर ढोके वय ३४ वर्ष, रा. मालवीय नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे.

**४) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १६/०३/२०१७ चे २२.३५ वा. दरम्यान यातील मृतक असुराज गुलाब ढबाले वय ५० वर्ष, रा. महालगाव हा दिनांक १६/०३/२०१७ ला विष प्राशन केल्याने त्यास सामान्य रुग्णालय भंडारा येथे औषधोपचारा करीता अती दक्षता विभागात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गिरडकर पोस्टे मोहाडी यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहे.

**५) बोलेरो पिकअप च्या चालकांच्या निष्काळजीपणामुळे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन राज्य मार्ग क्र. २७१ डांबरी रोडवर त्याचे वाहनात गव्हाचा कुटार भरुन त्याचे वर ४ ते ५ लोकांना बसवुन त्यांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपने चालवितांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

६) शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक १८/०३/२०१७ चे १६.४५ ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अधिनस्त असलेले कर्मचारी आरोपी कडे असलेल्या न.प.चे कर्मचारी दुकान कर वसुली करीता गेले असता यातील आरोपीने सरकारी कामात अडथळा करुन सरकारी नौकराने कायदेशीररित्या जाहीर केलेला हुकुम न मानता दुकानास लावलेले सिल तोडले व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केल्याने फिर्यादी अनिल अडागडे वय ५६ वर्ष, मुख्याधिकारी नगर परिषद भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८६,१८८,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

७) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १७/०३/२०१७ चे २०.५० वा. दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाचे आपल्या ताब्यातील टाटा सुमो गाडी क्र. २७ एसी ०४४७ चा चालकाने दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे त्याचे वैद्यकीय तपासणी अहवाला वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नेतामे पोस्टे लाखांदुर हे करीत आहेत.

८) सार्वजनीक ठिकाणी वाहन उभे ठेवुन रहदारीस अळथडा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १८/०३/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील टाटा सुमो गाडी क्र. एमएच ३१ सीपी १९३४ चा चालक याने आपल्या ताब्यातील वाहन आम रोडवर सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भांदवि. मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १८/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीत्ती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.